“श्रीक्षेत्र भिमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, तालुका खेड सह तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे” विकास आराखडा,
निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवि-२०१९/प्र.क्र.५९/का.१४४४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २३ ऑगस्ट, २०१९

वाचा :-

नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवि-२०१८/प्र.क्र.०५/का.१४४४,
दि. २८ फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना :-

“श्रीक्षेत्र भिमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, तालुका खेड सह तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे” विकास आराखड्यास दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये, रु.१४८.३७ कोटीच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. या आराखड्याकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करण्यात आलेला निधी जिल्हाधिकारी, पुणे यांना उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

“श्रीक्षेत्र भिमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, तालुका खेड सह तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे” विकास आराखड्यांतर्गत मंजूर कामे करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांना सन २०१९-२० मध्ये रु. २७.०० कोटी (रुपये सत्तावीस कोटी फक्त) निधी वितरित करण्यात येत आहे. या निधीचे उद्दिष्टनिहाय वाटप खालीलप्रमाणे आहे.:-

मुख्य लेखाशिर्ष	उद्दिष्ट	अर्थसंकल्पित तरतूद	६०% च्या मर्यादेत वितरित करावयाचा निधी
५४५२ (पर्यटनावरील भांडवली खर्च) ५४५२०१५१	५३ मोठी बांधकामे	रु. ४५.०० कोटी	रु. २७.०० कोटी
	एकुण	**रु. ४५.०० कोटी**	**रु. २७.०० कोटी**

२. “श्रीक्षेत्र भिमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, तालुका खेड सह तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे” या विकास आराखड्यांतर्गत मंजूर कामांवर होणारा खर्च लेखाशिर्ष “मागणी क्र.ओ-१०, मुख्य लेखाशिर्ष ५४५२-पर्यटनावरील भांडवली खर्च, ०१-पर्यटनसाठी पायाभूत सुविधा, १०१-पर्यटन केंद्र, (००) (०९) (५४५२ ०१५१) कार्यक्रम (दत्तमत)” याखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. “श्रीक्षेत्र भिमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, तालुका खेड सह तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे” या विकास आराखड्यांतर्गत वर नमुद केलेल्या लेखाशिर्षांतर्गत झालेला प्रत्यक्ष खर्च व प्रधान महालेखापाल, मुंबई यांचे कार्यालयाने नोंदविलेला खर्च याचा ताळमेळ घालण्यात यावा. तसेच वितरित केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी पुणे यांनी शासनास तात्काळ सादर करावे.

४. वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै,२०१९, अन्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हा शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२३१५१७१५३४१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIDYA RAMAPPA HAMPAYYA

Digitally signed by VIDYA RAMAPPA HAMPAYYA
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=7b40f543d9d95d4cad6707bb7eae1089289d9878b7cb34418f111566e3223ba1, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a94ef1b631f4673b829ac9adbeb5b0ddabd086a7544e3fdf47cd7a011ff7ea40, ou=PLANNING DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIDYA RAMAPPA HAMPAYYA
Date: 2019.08.23 15:27:21 +05'30'

(विद्या हम्पय्या)
उप सचिव

तातडीच्या आवश्यक कार्यवाहीसाठी,

विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. विरोधी पक्षनेता विधानपरिषद / विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५) मा. राज्यमंत्री उद्योग व खणीकर्म, व पर्यावरण तथा पालकमंत्री,(पुणे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य,
८) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई,

१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर,

११) जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे,

१२) वित्त विभाग (व्यय-८)/(अर्थ-१६) मंत्रालय, मुंबई,

१३) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,

१४) नियोजन विभाग, का.१४२४, मंत्रालय, मुंबई,

१५) निवड नस्ती, का. १४४४, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
